**नियमित दिवाणी दावा क्र. १४५/२०२२ मधील निशाणी क्र. ६० वरील आदेश**

(निवृत्ती फोकणे वि. काशिनाथ फोकणे व इतर)

(सीएनआर नं. एमएचएनएस२३००१६१३–२०२२)

वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १३ चे कायदेशिर प्रतिनिधी अभिलेखावर सामिल करुन घेणकरीता दाखल केला आहे.

**०२.** अर्ज व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीचे विव्दान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०३.** प्रतिवादी क्र. १३ विमला संपत मिसाळ हिचा मुत्यु दिनांक १४.०९.२०२३ रोजी झाला आहे. कायदेशीर तरतुदींप्रमाणे सदर प्रतिवादीचे कायदेशिर प्रतिनिधी दिनांक १४.१२.२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी अभिलेखावर घेणे आवश्यक होते. नि. ५६ व ५८ वरील आदेशाप्रमाणे दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होणेकरीता अर्ज दाखल करणेस झालेला विलंब माफ करण्यात आला आहे व दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द करण्यात आला आहे. अर्ज व प्रतिज्ञापत्रातील मजकुराप्रमाणे अर्जात नमूद इसम हे मयत प्रतिवादी क्र. १३ चे कायदेशिर प्रतिनिधी आहेत असे समजण्यात मला कोणतीही अडचण दिसून येत नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने नि. ५६ वरील आदेशाची पुर्तता करुन कायदेशिर मुदतीमध्ये प्रतिवादी क्र. १३ च्या कायदेशिर प्रतिनिधींना अभिलेखात समाविष्ट करावे व दुरुस्ती दावा प्रत दाखल करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

NANAWARE MOHINI DATTATRAY
Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2026.07.18 14:59:22 +0530

स्थळ:– इगतपुरी

दिनांक:– १८/०७/२०२६

( मो. द. ननवरे )

दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, इगतपुरी.